

## शेत शिवार सल्ला

डॉ. प्रशांत बोडके
संचालक,
संशोधन मफुकृवि, राहुरी

# हवामान आधारित कृषी सल्ला

पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. बाष्पीभवनामुळे जमिनीतील सुमारे ७० टक्के ओलावा उडून जातो. तो रोखण्यासाठी पीक उगवणीनंतर १५ दिवसांच्या आत पिकांच्या दोन ओळींत जमिनीवर हेक्टरी ५ टन सेंद्रिय पीक अवशेष (काडी-कचरा, उसाचे पाचट, तुरकाट्या, ज्वारीची धसकटे, वाळलेले गवत इ.) पसरावे. यामुळे २५ ते ३० मि.मी. ओलाव्याची बचत होते आणि उत्पादनात ३० ते ४० टक्क्यांनी वाढ होते. तसेच जमिनीतील ओलाव्याचे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते.

## पशुधन व्यवस्थापन

१. खरीपाच्या कडबा, भुसा व इतर अवशेष योग्य प्रकारे साठवून ठेवावेत.
२. जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचा उपयोग करून चाऱ्यासाठी रब्बी ज्वारीची पेरणी करा..
३. मका पीक उपलब्ध असलेल्या ठिकाणी मुरघास तयार करून साठवून ठेवावा.
४. बांधावरील गवत योग्य पद्धतीने कापून, वाळवून आणि रचून ठेवावे.
५. अतिरिक्त हिरवा चारा चांगल्या प्रकारे वाळवून त्याचा पुढील आपत्कालीन परिस्थितीत वापर करा..

# ही कामे त्वरित करा

**सोयाबीन :** शेंगांचा रंग पिवळट तांबूस झाल्यानंतर, जातीच्या पक्वतेनुसार १०० ते ११० दिवसांत काढणी पूर्ण करून घ्यावी. उशीर झाल्यास शेंगा फुटण्यास सुरुवात होते.- मका: पक्व झालेल्या कणसांची काढणी करून ४-५ दिवस चांगले उन्हात वाळवून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करा..

**तूर :** किडी व रोगांचे नियमित सर्वेक्षण करा.. वांझ व मर रोगाचा प्रादुर्भाव दिसताच झाडे उपटून नष्ट करावीत. फुलोऱ्याची सुरुवात होतेवेळी ५ टक्के लिंबोळी अर्काची पहिली फवारणी करा..

**रब्बी पिके :** ज्या भागात पाण्याची उपलब्धता आहे, तिथे कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची (ज्वारी, बाजरी, करडई, सूर्यफूल, हरभरा, मका इ.) निवड करा..

**हरभरा :** 'फुले विक्रम' या जातीची लागवड करून तुषार सिंचन पद्धतीने पाणी दिल्यास शाश्वत उत्पादन शक्य आहे.



